(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed


### Multidisciplinary International Research Journal

**March-2020**

**SPECIAL ISSUE-CCXXIV(224)**





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# आधुनिक समाजातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा

प्रा. आनंद गो मनवर
समाजशास्त्र विभाग प्रमुख ,युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय अमरावती.

## प्रस्तावना

स्त्रीचे सामाजिक स्थान अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बाबीवर अवलंबून असते. समाज शेतीप्रधान आहे की उद्योगप्रधान कुटुंबव्यवस्था मोठी आहे की लहान यावर समाज घटकाना राजकीय स्वतंत्र आहे की नाही. यावर स्त्री चे हक्क तिला मिळणाऱ्या सवलती आणि तिच्या कडून अपेक्षित असणाऱ्या जबाबदाऱ्या अवलंबून असतात स्त्रीचा दर्जा जसा व्यवस्था व परिस्थितीशी निगडित असतो तसाच तो समाजमान्य नितीमुल्यावर अवलंबून असतो. तिला शिक्षण देऊन अर्थजन करू द्यावे की अबला आहे म्हणून तिला घराच्या चार भिंती मध्ये सुरक्षित ठेवण्याचा खटाटोप करावा. हा परिणाम त्या त्या समाजाचा प्रश्न होऊन बसतो. आजपर्यंतच्या इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्याला विविध प्रकारचे समाज दिसतात. हे समाज ज्याना वेळोवेळी घडविले ते त्यांच्या निती मुल्यावर आणि त्यांनि स्वीकारलेल्या व्यवस्थेवर उभे राहिले काही समाजात गरजेनुसार व्यवस्था बदलाव्या लागल्या. काही मध्ये नीतिमूल्ये बदलली आणि त्याबरोबर समाजातील स्त्रियांना कधी शिकायला मिळावे तर कधी घरात बसून राहावे लागले.कधी मना प्रमाणे मनाचा जोडीदार निवडला आला तर कधी पती हाच देव माणून कळत नकळत तोपर्यंत सासरी जावे लागले.

## ब्रिटिश राजवट

इग्रजी राजवट आपल्या देशात आली तिच्याबरोबर इंग्रजांनी व्यक्तिवादी दृष्टीकोण आणि पुरुष असमानतेची जाणीवही आपल्याकडे आली.या जाणिवेने सुधारक विचारवंत लेखक हे सारेच विलक्षण प्रभावित झाले त्या सर्वांना असे वाटू लागले की अज्ञान, शिक्षणाचा अभाव बुद्धीमतेच्या विकासाला होणारे अडथळे हेच आपल्या स्त्री वर्गाच्या दुःखाचे आणि परिस्थितीवर मात करत विधेच्या क्षेत्रात पुढे पुढे सरकत होती.पण लवकरच असे असे प्रत्ययाला आले की शिक्षणामुळे स्त्रीच्या साऱ्या व्यथा संपतील सर्व समस्या मिटतील असे जे पूर्वीच्या विचारवंतांना वाटत होते ते तितकेसे बरोबर नव्हते शिक्षणामुळे स्त्री समोर उलट काही नव्या समस्या निर्माण झाल्या.

ISSN : 2278-9308
March 2020

**स्वातंत्र्योत्तर काळ**

१९४७ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने नव्या योजना आखल्या त्यामुळे स्त्रियांच्या दर्जात सुधारणा झाली.स्त्रीयांच्या प्रगतीसाठी अनेक कायदे केले गेले आणि कायद्याद्वारे महिलांना संरक्षण मिळाले.

**कायदे विषयक तरतुदी**

१ )१९५५ द्वीभार्या प्रतिबंध कायदा आला पहिली पत्नि जिवंत असताना दुसरे लग्न एखाद्या पुरुषाने करणे शिक्षापात्र गुन्हा आहे.

२ ) १९५६ साली वारसा हक्क कायदा पास झाला १९५६पर्यंत स्त्रियांनी संपत्तीचे मालक होणे हे एक स्वप्न होते पण ते आता वास्तवात आले त्यामुळे स्त्रियांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा उंचावला

३) १९८४साली शासनाने वैवाहिक आणि कौटुंबिक प्रश्न सोडविण्यासाठी कुटुंब न्यायालयाची स्थापना केली या न्यायालया मुळे स्त्रीयांचे कौटुंबिक प्रश्न सुटू शकतात.

४)महिला आयोगाची स्थापना आणि विधानसभा लोकसभेतील महिला कल्याण विभाग यामुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा सुधारला.

**आधुनिक काळातील स्त्रियांचा दर्जा:-**

आजच्या आधुनिक काळामध्ये काही बाबतीत आपण पुष्कळच प्रगती केली आहे शिक्षणाचा प्रसार पूर्वी पेक्षा खूप अधिक प्रमाणात झाला आहे.ग्रामीण स्त्रिया,दलित स्त्रिया इथपर्यंत शिक्षणाचे लोन कमी-अधिक प्रमाणात पोहोचले आहे. अनेक स्त्रीमुक्ती संथानच्या आणि कार्यकर्त्यास्त्रीयांच्या अथक प्रयत्नांमुळे विवाहित स्त्रियांवर किंव्हा कुमारीकावर होणाऱ्या जुलुम जबरदस्तीला प्रथमच वाचा फुटत असल्याने आपण बघत आहोत. पत्नीचा हुंड्यासाठी वा इतर वस्तूसाठी छळ करणे माहेरहून विशिष्टवस्तू आणण्यासाठी तिच्यावर सक्ती करणे तिला जाळने असे अन्याय पूर्वी घरात चार भिंतीत दडवले जात आता ते कोर्टापुढे येत आहे त्यांना सुद्धा शिक्षा होत आहे.

आजची स्त्री जीवनाच्या विविध क्षेत्रात मुक्तसंचार करत आहे. पुरुष जि जि कामे करतो ती सर्व कामे स्त्री स्वीकारताना दिसते ती मोठ्या कंपन्या म्हधून, कारखान्यांमधून एक्झिक्युटिव असते कंपनीच्या कामासाठी प्रदेश प्रवाह करने स्त्री असून अनेक पुरुष सहकार्या बरोबर मोकळेपणाने कामे करते. त्यांना दबावात हि ठेऊ शकते. व्यापार उद्योगापासून राजकारणापर्यंत विविध उत्पादका पासून नवीन शोध लावण्यापर्यंत सारे काही ती जबाबदारीने पुरुषा इतके कार्यक्षमतेने करण्यात पटाईत आहे. अनेक स्त्रिया सामाजिक कार्यात स्वतःला गुंतवून दुर्गम प्रदेशात निर्भयपणे एकटे राहून आपल्या कार्याची धुरा सांभाळनाऱ्या. पूर्वीच्या

ISSN : 2278-9308
March 2020

काळातील गोदावरी परुडेकर किंवा आजच्या काळातील मेघा पाटकर असो की किरण बेदी असो राजकीय क्षेत्रात सर्वोच्चपदी असलेल्या प्रतिभाताई पाटील अश्या स्त्रियाचे नावे या संदर्भात कुणालाही आठवतील .

या सर्वदृष्टीने विचार केला तर असे म्हणता येईल की चार भिंतींमध्ये सुरक्षित व परावलंबी जीवन जगणाऱ्या जुन्या काळातल्या मध्यमवर्गीय गृहिणी पेक्षा आजची त्याच वर्गातील स्त्री अधिक साहसी जीवन जगत आहे. अधिक कष्ट नव्या आव्हानांना तोंड देत आहे.मोकळ्या वातावरणामध्ये श्वास घेत आहे.व आजही ती कुटुंब प्रिय आहे आणि स्त्री जीवन कितीही बदलले तरी मुले बाळेघर संसार यांची ओळ तिला वाटतच राहणार.

निष्कर्ष :-

1) आधुनिक समाजातील अनेक महिला स्वावलंबी झाल्या आहेत.

2) शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात सामन हक्क प्राप्त झाले.

3)अनेक स्त्रिया अन्याय अत्याच्यारा विरुद्ध आवाज उठवताना दिसतात.

4)आजची स्त्री पुरुषाच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1) काळदाते सुधा, भारतीय समाज रचना

2) शेळके सिंधू,स्त्री काल आज उद्या

3) खडपेकर विनया, स्त्री-स्वातंत्र्य वादीने

4)प्रा. कवि माधवी, महिला कल्याण आणि विकास

5) प्रा.मुणाली एम.यु. महिला स्वयंसहाय्यता बचत गट

6) शर्मा प्रेम नारायण, महिला सशक्तीकरण एव सग्रामविकास